महाराष्ट्र शासन

**उपवनसंरक्षक (प्रादे.) अकोला वनविभाग अकोला यांचे कार्यालय**

"वसुंधरा हॉल", मंगरुळपीर रोड, अशोक वाटीका जवळ, अकोला-444001

दुरध्वनी क्रमांक 0724-2415600 ईमेल-dycfakola@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग

क्रमांक:-कक्ष-2/संकिर्ण/वसंअ-1980/ 824 /2023-24. अकोला, दिनांक- 30 / 06 /2023.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
अमरावती.

**विषय:-** वनजमीन अकोला.
शेतीसाठी भुमीगत पाण्याची पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी मौजा मोझरी खुर्द ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील श्री. मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकणेबाबतचे 0.32 हे. वनजमीन वळतीकरण प्रस्ताव.

**संदर्भ:-** 1.शासन पत्र क्र. एफएलडी-3023/प्र.क्र.34/फ-10, दि. 16.02.2023.
2.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांचेकडील पत्र क्र. 17/नोसेल/अमरावती/आयडी-13189/3128, दि. 17.02.2023.
3.प्रकल्प यंत्रणा श्री. मधुकर शेवला राठोड यांचेकडील दिनांक 27.03.2023 रोजीचा पुर्तता अहवाल.

विषयांकीत प्रकरणी शासन संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत मौजा मोझरी खुर्द ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील श्री. मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकणेबाबतचे 0.32 हे. वनजमीन वळतीकरण प्रस्तावा क्र. 1 ते 6 मुद्यांचा त्रुटी पुर्तता अहवाल सादर करणेबाबत मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपुर यांनी संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये कळविले आहे. प्रकरणी संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये प्रकल्प यंत्रणा त्रुटी पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

त्याअनुषंगाने शासन पत्रातील खालीलप्रमाणे नमुद क्र. 1 ते 6 त्रुटी मुद्यांचा पुर्तता अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | त्रुटी मुद्यां | पुर्तता अहवाल |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावामध्ये पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन साठी 3 पर्याय दिले आहेत. त्यापैकी "अ" येथील पर्याय वनक्षेत्राच्या दृष्टीने सर्वात उपयुक्त असल्याने प्रस्तावित करण्यात आला आहे. इतर "ब" आणि "क" पर्यायामध्ये जास्त वनक्षेत्राचा वापर होत असल्याने पर्याय नाकारले आहेत. परंतु, नकाशाचे अवलोकन केले असता, "अ" "ब" आणि "क" येथील पर्यायासाठी अनुक्रमे 760 मी., 701 मी. आणि 625 मी. (लांबी) एवढया क्षेत्राचा वापर होणार आहे. या उक्त 3 पर्यायापैकी "क" येथील पर्यायामध्ये कमी वनक्षेत्राचा वापर होत असल्याचे दिसून येत. असे असतानाही प्रस्तावित "अ" येथील 760 मी. पर्यायापेक्षा जास्त अंतराचा म्हणजेच 800 मी. अंतराचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी याबाबतचे स्पष्टीकरण सादर करावे. | **पर्याय "अ" प्रमाणे :-** पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या 760 मी. अंतराचे क्षेत्र बाधीत होत असले तरी पर्याय "ब" आणि "क" चे तुलनेत या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारचे वृक्ष बाधीत होत नाहीत आणि हे क्षेत्र कमी घनतेचे असल्यामुळे पाईप लाईन टाकण्याचे दृष्टीने योग्य असुन त्या क्षेत्रात वनाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. त्यामुळे सदर क्षेत्र पाईप लाईन करीता प्रस्तावित करण्यांत आले आहे. तसेच उन्हाळयात तलावातील पाण्याची पातळी मागे सरकत असल्यामुळे शेतक-यांना भविष्यात पाण्याचा प्रश्न उद्भवणार नाही व इतर अडचणी येणार नाहीत या दृष्टीने तलावाचे आतील भागातुन मोजमाप करुन प्रकल्प बाधीत क्षेत्र प्रस्तावित करण्याची शेतक-यांची विनंती होती. त्याअनुषंगाने पाईप लाईनची लांबी 800 मी. दर्शविण्यांत आलेली आहे.<br>**पर्याय "ब" आणि "क" प्रमाणे:-** वनक्षेत्रामध्ये कमीत कमी 10 फुटापर्यंत पाणी वाहुन 3 ते 4 नाले तयार झाल्याने त्या क्षेत्रातुन शेतक-यांना पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकता येणे शक्य नसल्यामुळे तसेच त्या क्षेत्रात वृक्ष बाधीत होत असल्यामुळे पर्याय "ब" आणि "क" नाकारण्यात आले आहेत.<br>सबब, पर्याय "ब" व "क" मधील प्रकल्प बाधीत क्षेत्र पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकणेकरीता योग्य नसल्यामुळे ते नाकारण्यात येवून, पर्याय "अ" मधील बाधीत क्षेत्र पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्याकरीता प्रस्तावित करण्यांत आले आहे. |

| | | |
|---|---|---|
| 2 | उक्त 3 पर्याया व्यतिरिक्त अन्य एक पर्याय उपलब्ध असून, मौजे मोझरी, सं.नं. 35 येथील वनेत्तर क्षेत्रामधुन पाण्याची पाईपलाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकल्यास अंदाजे 200-250 मी. (लांबी) एवढेच क्षेत्र लागू शकेल, याबाबत माहिती सादर करावी. | उक्त 3 पर्याया व्यतिरिक्त अन्य मोझरी सर्व्हे नंबर 35 पर्याय आहे. परंतु नकाशा प्रमाणे शेतक-यांचे शेतीचे विरुध्द दिशेने मोझरी स.न. 35 आहे. शेती तलावाच्या पूर्व दिशेला असुन सर्वे नं. 35 हे पश्चिम दिशेला दिसुन येते. मोझरी तलावातुन सर्वे नं. 35 मधुन पाईप लाईन टाकणे पाणी पुरवठयाच्या अनुषंगाने शेतक-यांना खर्चाचे असल्यामुळे वरील पर्याय उपयुक्त नाही. |
| 3 | भुमिगत इलेक्ट्रीक लाईन टाकण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले 3.00 रुंदी चे क्षेत्र व्यवहार्य वाटत नाही. याबाबत अधिक माहिती सादर करावी. तसेच पाईपलाईनच्या खंदकामध्ये इलेक्ट्रीक लाईन टाकता येणे शक्य आहे किंवा कसे, याबाबतही माहिती सादर करावी. | पाईप लाईन सोबतच 11 के.व्ही इलेक्ट्रीक लाईन जात आहे. पाईप लाईन व 11 के.व्ही. इलेक्ट्रीक लाईन मध्ये कमीत कमी 2 मी. अंतर ठेवुनच खंदक खोदावे लागतील. पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन एकाच खंदकात टाकल्यास भविष्यात इलेक्ट्रीक लाईन मध्ये अथवा पाईप लाईन तुटफुट झाल्यास ओलाव्यामुळे जमीनीमध्ये विद्युत प्रवाह पोहचेल व त्यामुळे मनुष्य अथवा वन्यप्राणी दगावण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता पाईप लाईनच्या खंदकामध्ये इलेक्ट्रीक लाईन टाकता येणे शक्य नसल्याने 3.00 रुंदी चे क्षेत्र प्रस्तावित करण्यांत आले आहे. |
| 4 | पर्यायी वनीकरणासाठी केंद्रस्थ अधिकारी यांनी मौजे मोझरी, ता. बार्शिटाकळी मधील कंपा.क्र. 397 येथील आणि उपवनसंरक्षक, यांनी मौजे सोनखास, ता. बार्शिटाकळी, मधील कंपा क्र.397 येथील वनक्षेत्र प्रस्तावित केले आहे. सदर 2 क्षेत्रांपैकी नेमके कोणते क्षेत्र पर्यायी वनीकरण प्रस्तावित करावयाचे आहे, याबाबत माहिती सादर करावी. तसेच सदर क्षेत्राचा 7/12 देखील सादर करावा. | सोनखास बिटमधील मौजे मोझरी येथील कक्ष क्र. 397 मधील स.नं. 24 मधील 1.00 हेक्टर क्षेत्राची निवड करुन पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केले आहे. त्यामुळे मा. केंद्रस्थ अधिकारी आणि उपवनसंरक्ष प्रस्तावित केलेले मौजे मोझरी व मौजे सोनखास येथील पर्यायी वनीकरणाचे क्षेत्र एकच आहे. सोबत मौजे मोझरी स.नं. 24 चा 7/12 तसेच Geo reference map, KML File जोडण्यात येत आहे. |
| 5 | प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी, मधील गट नं. 25 हा कंपा क्र. 397 भाग असल्याचे नमूद केले आहे. परंतु नकाशा व KML File वरुन गट नं. 25 मधील क्षेत्र कंपा क्र. C29B चा भाग असल्याचे दिसते. सबब, याबाबत खात्री करण्यात यावी. | मौजे मोझरी खु. मधील स.नं. 25 कक्ष क्र. 397 भाग नसुन कक्ष क्र. सी-29B मौजे मोझरी चा भाग आहे. परंतु, अनावधानाने प्रस्तावात स.नं. 25 हा कक्ष क्र.397 चा भाग असल्याचे दर्शविण्यात आले आहे. तरी याबाबत दुरुस्ती होणेस विनंती आहे. |
| 6 | प्रस्तावामध्ये वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी येथील गट नं. 23, 24 व 25 या जमीनीच्या 7/12 उता-यावर अनुक्रमे ए क्लास, सरकार व सी क्लास अशा नोंदी आहेत. सबब, सदर वनजमीन आहे किंवा कसे? याबाबत खातरजमा करणे आवश्यक आहे. | प्रस्तावामध्ये वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे मोझरी खु. येथील गट नं. 23, 24 व 25 या जमीनीच्या 7/12 उता-यावर अनुक्रमे ए क्लास, सरकार व सी क्लास अशा नोंदी असले तरी हया गट नं. 23, 24 व 25 हि जमीन अभिलेख्यानुसार वन विभागाची आहे आणि गट नं. 23, 24 हा कक्ष क्र. 397 तसेच गट नं. 25 हा कंपा क्र. सी-29B चा भाग आहे. सोबत 23, 24 व 25 चे सांक्षाकित 7/12 प्रती जोडण्यात येत आहेत. |

सहपत्र-वरीलप्रमाणे. (पूर्तता अहवाल 5 प्रतित)

(अर्जुना के. आर.)
उपवनसंरक्षक
अकोला वन विभाग, अकोला.

30/06/23

प्रतिलिपी-सहाय्यक वनसंरक्षक (वने), अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी-श्री. मधुकर शेवला राठोड, रा. मोझरी खुर्द ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांना माहिती करीता रवाना.